दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २६३ वा | बुधवार दि. १९ जुलै २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## सोमय्यांच्या व्हिडिओतील महिला कोण : परब

**मुंबई ।** भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या कथित व्हायरल व्हिडिओ प्रकरणाचे मंगळवारी विधिमंडळात तीव्र पडसाद उमटले. शिवसेनेच्या ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी विधान परिषदेत



या प्रकरणी पीडित महिलेची ओळख पटवून व्हिडिओची सत्यता पडताळून पाहण्याची मागणी केली. व्हिडिओ व्हायरल झालेल्या भाजपच्या माजी खासदाराने अनेकांचे आयुष्य उद्धस्त झाल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.या व्हिडिओची सत्यता बाहेर आली पाहिजे. व्हिडिओतील महिला कोण? हे स्पष्ट झाले पाहिजे.

## न्यूज कॉलम

### मिनाबाई करनकाळ यांच्यावर अंत्यसंस्कार

**धुळे ।** मनपा चे प्रथम महापौर भगवानबापुजी करनकाळ यांच्या धर्मपत्नी, व नंदुरबारच्या माहेरवाशीण- सौ. मिनाबाई भगवान करनकाळ



यांच्यावर दि. १८/०७/२०२३ रोजी त्यांच्या धुळेकरांच्या साक्षीने अंत्यसंस्कार करण्यात आले. दि. १७।०७।२०२३ रोजी, फुफ्फुसाच्या आणि किडनीच्या दुर्धर आजाराने त्यांचे निधन झाले. एक वर्षापासून, या जीवघेण्या आजाराने त्या त्रस्त होत्या. मिनाबाई भगवान करनकाळ यांना सर्व पक्षीय नेत्यांनी देखील अखेरचा निरोप दिला. यावेळी धुळेकर नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती.

### दोंडाईचा शहरातून मोटारसायकली लंपास

**धुळे ।** दोंडाईचा येथील एका कॉम्प्युटर सेंटर येथून भूषण संजय पाटील ( वय २९) या तरुणाची मोटारसायकल (एम एच १८, बी एस ६५५२ ) चोरट्यांनी लांबवली. भर दुपारी चोरी झाली. तर अन्य एका घटनेत रानफुल कॉलनीत राहणारे सचिन कल्याणराव खैरनार यांची मोटारसायकल (एम एच १८, बी टी ८६३५) अंगणातून चोरीस गेली. सकाळी हा प्रकार समोर आला.

# होय हा कुटुंब वाचवण्याचा लढा, देश हेच आमचं कुटुंब : उद्धव ठाकरे

**मुंबई । प्रतिनिधी**

आम्ही भाजपविरोधातील लढाईत नक्की यशस्वी होऊ, काही लोक याला कुटुंब वाचविण्यासाठी एकत्र आले अशी टीका करत आहेत. होय, हा कुटुंब वाचवण्याचा लढा आहे. पण आमचे कुटुंब हे देश आहे. देशातील सद्यस्थितीतील वातावरणामुळे जनता घाबरली आहे. पण जनतेला एवढे सांगू इच्छितो की, घाबरू नका, आम्ही आहोत ना, असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. ते मंगळवारी बंगळुरूत आयोजित करण्यात आलेल्या विरोधकांच्या बैठकीनंतरच्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

या पत्रकार परिषदेवेळी, उद्धव ठाकरे यांनी म्हटले की, देशाला वाचवण्यासाठी हा लढा आहे. वेगवेगळ्या विचारांचे पक्ष असलो तरी एकत्र आलो आहोत. वेगवेगळे विचार असणे हीच लोकशाही आहे. आमचे वेगळे विचार असले तरी एक आलो आहोत. त्याला काही कारणे आहेत. काहींना वाटते की आम्ही आमचा पक्ष, कुटुंब वाचवायला आलो आहोत. हा देश आमच्यासाठी कुटुंब आहे..आम्ही देश वाचवायला आलो आहोत, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपकडून विरोधी पक्षांच्या आघाडीवर टीका करण्यात येत होती. विरोधी पक्ष हे आपलं कुटुंब, पक्ष वाचवण्यासाठी आले असल्याची टीका करण्यात आली होती. त्या टीकेला उद्धव ठाकरे यांनी नाव घेता प्रत्युत्तर दिले. उद्धव ठाकरे यांनी म्हटले की, देशाला वाचवण्यासाठी हा लढा आहे. वेगवेगळ्या विचारांचे पक्ष असलो तरी एकत्र आलो आहोत. वेगवेगळे विचार असणे हीच लोकशाही आहे. आमचे वेगळे विचार असले तरी एक आलो आहोत. त्याला काही कारणं आहेत. काहींना वाटतं की आम्ही आमचा पक्ष, कुटुंब वाचवायला आलो आहोत. हा देश आमच्यासाठी कुटुंब आहे..आम्ही देश वाचवायला आलो आहोत, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले.

ठाकरे यांनी पुढे म्हटले की, आम्ही एका व्यक्तीविरोधात नाही. आम्ही हुकूमशाही प्रवृत्तीच्या विरोधात आहोत, त्यांच्या धोरणाविरोधात आहोत. देशातील नागरिकांमध्ये भवितव्याबद्दल चिंता आहे. देशातील लोकांना आम्ही विश्वास देऊ इच्छितो की तुम्ही चिंता करू नका आम्ही आहोत, असेही ठाकरे यांनी म्हटले.



### हा देशच आमचे कुटुंब

**या बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना उद्धव ठाकरे म्हणाले की, आम्ही वेगळ्या विचारधारेचे लोक एकत्र कसे येणार, असा प्रश्न विचारला जातो. पण राजकारणात वेगळ्या विचारधारा असल्या पाहिजेत. यालाच तर लोकशाही म्हणतात. हा फक्त आमच्या पक्षाचा प्रश्न नाही. काहींना वाटतं की, आम्ही कुटुंबासाठी लढत आहोत. होय, हा देश आमचं कुटुंब आहे, आमची लढाई ही देशातील हुकूमशाहीविरोधात आहे.**

### विरोधकांची पुढील बैठक मुंबईत

**या पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनीही आपले विचार मांडले. आमची आजची बैठक खूपच यशस्वीरित्या पार पडली. आमची लढाई ही भाजपच्या विचारधारेविरोधात आहे. ही विचारधारा देशावर आक्रमण करत आहे, देशात बेरोजगारी वाढत आहे, संपत्ती मोजक्या लोकांच्या हाती एकटवत आहे. देशाचा आवाज दडपला जातोय, यासाठी ही लढाई आहे. त्यामुळेच विरोधकांच्या आघाडीचे नाव इंडिया असे ठेवण्यात आले. ही लढाई नरेंद्र मोदी आणि इंडियात आहे, दोन विचारधारांमध्ये आहे. इंडिया समोर कोणीही उभा ठाकतो, तेव्हा त्यांचं काय होतं, हे सगळ्यांना माहिती आहे, असे राहुल गांधी यांनी म्हटले.**

### लढाई हुकूमशाहीविरोधात

**देशातील स्वातंत्र्य धोक्यात आल्याने आम्ही लढत आहोत. ही लढाई एखादा पक्ष किंवा व्यक्तीविरोधात नाही तर निती आणि हुकूमशाहीविरोधात आहे. एक व्यक्ती किंवा एक पक्ष हा देश होऊ शकत नाही. या लढाईत आम्ही नक्की यशस्वी होऊ, असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. सध्याच्या वातावरणामुळे देशातील जनता घाबरली आहे. मात्र, मी त्यांना विश्वास देऊ इच्छितो की, 'तुम्ही घाबरु नका, आम्ही आहोत', असेही उद्धव ठाकरे म्हणाले.**

### समन्वय समिती स्थापन करणार

**काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितले की, आघाडीची पुढील बैठक मुंबईत होणार आहे. पुढील बैठकीत समन्वय समितीची बैठक होणार आहे. या समितीत ११ सदस्य असणार आहेत. त्यातील नावांबाबत पुढील बैठकीत निर्णय घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

# सोमैय्यांच्या कथित व्हायरल व्हिडीओनंतर नाशिकमध्ये ठाकरे गटाचे आंदोलन



**मुंबई । प्रतिनिधी**

भाजप नेते किरीट सोमैय्या यांच्या कथित व्हिडिओ क्लिप प्रकरणी राज्यभरात संताप व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर नाशिक शहरात देखील ठाकरे गटाच्या वतीने जोरदार आंदोलन करण्यात आले. ठाकरे गटाच्या शिवसेना कार्यालयासमोर असंख्य महिलांनी एकत्र येत किरीट सोमैय्या यांच्या प्रतिमेला जोडे मारत अनोखे आंदोलन केले.

भाजपा नेते किरीट सोमय्या यांचा कथित आक्षेपार्ह व्हिडीओ व्हायरल झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. या व्हायरल व्हिडीओ प्रकरणात आता राजकीय नेत्यांच्या प्रतिक्रियादेखील समोर येत आहेत. दरम्यान आज रोजी नाशिकमध्ये ठाकरे गटाच्या महिला आघाडीने सोमय्यांविरोधात आंदोलन (झ्रोंशिीं) केले. आता 'कुठं नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा?' किरीट सोमैय्या हाय हाय, अशा आशयाच्या घोषणा देत निदर्शने करण्यात आले. यावेळी सोमय्या यांच्या प्रतिमेला जोडे मारण्यात आले. नाशिकमध्ये शिवसेना ठाकरे गटाच्या महिला पदाधिकार्यांनी शालिमार चौकात किरीट सोमय्या यांच्या कथित व्हिडीओ प्रकरणाचा खरपूस समाचार घेत तीव्र शब्दात निषेध करून त्यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन केले.

दरम्यान एका मराठी वृत्तवाहिनीने हा व्हिडीओ प्रसारित केल्यानंतर किरीट सोमैय्या चांगलेच चर्चेत आले आहेत. गेल्या काही दिवसांत त्यांनी अनेक नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. अशातच किरीट सोमय्या यांचा एका महिलेसोबतचा कथित व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर महिला वर्गात संतापाची लाट उसळली असून 'किरीट सोमय्या कोणत्या प्रवृत्तीचा माणूस आहे, हे त्याच्या घाणेरड्या कृत्यावरून सिद्ध झाले आहे. त्याच्या प्रतिमेला जोड्याने मारणे हा जोड्याचा अपमान असल्याच्या प्रतिक्रिया आंदोलक महिलांनी व्यक्त केल्या.

# निधी वितरणात सत्ताधाऱ्यांकडून अन्याय

### काँग्रेस सदस्यांचा उपोषणाचा इशारा

**धुळे । प्रतिनिधी**



धुळे पंचायत समितीमार्फत दिला जाणारा शासनाचा पर्यायाने हक्काचा १५ वा वित्त आयोगाचा निधी आणि शेष फंडच्या निधी वितरणात सत्ताधारी भाजपा अन्याय करीत असून धुळे पंचायत समितीतील सत्ताधार्यांनी स्वत:साठी जास्त जास्त निधी ठेवून घेत आहे. आणि काँग्रेसच्या सदस्यांना डावलून कमी प्रमाणात निधी दिला जात आहे. परिणामी काँग्रेसच्या पं.स.गणातील गावांतील विकास कामांना चालना मिळत नसून मतदारांवर सत्ताधारी भाजपा व मित्र पक्ष अन्याय करीत आहे. त्यामुळे धुळे पंचायत समितीतील सर्व सदस्यांना समप्रमाणात निधीचे वितरण करण्यात यावे अन्यथा उपोषणाचा मार्ग अवलंबावा लागेल असा इशारा आज काँग्रेसचे सदस्य व पदाधिकार्यांनी दिला आहे.

धुळे पंचायत समितीच्या सर्व सदस्यांना १५ वा वित्त आयोगाचा निधी आणि शेष फंडचा निधीचे समप्रमाणात वितरीत व्हावा म्हणून आज दि.१८ जूलै रोजी धुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी एस.भूवनेश्वरी यांची काँग्रेसच्या सदस्यांनी व पदाधिकार्यांनी भेट घेतली. यावेळी त्यांनी निधी वितरणाबाबतचे निवेदनही दिले. निवेदनानुसार मुख्य कार्यकारी अधिकार्यांशी चर्चा करतांना काँग्रेस सदस्यांनी सांगितले कि, धुळे पंचायत समितीवर भाजपा आणि मित्रपक्षाची सत्ता आहे. त्यामुळे १५ वा वित्त आयोगाचा निधी आणि शेष फंडच्या निधी वितरीत करतांना त्यांना जास्तीचा निधी दिला जातो. तर काँग्रेसच्या सदस्यांना मुद्दामहून कमी निधी देवून निधी वितरणात अन्याय केला जात आहे. परिणामी त्या पं.स.गणातील गावांचा विकासला खीळ घालण्याचे काम सत्ताधारी भाजपा करीत आहे.

यावेळी फागणे पं.स.सदस्या सुरेखा बडगुजर, अंजनाबाई मोरे, अश्विनी गर्दे, विद्या पाटील, मंगला भिल, दिपक कोतेकर, योगीराज पवार, मीनाबाई सोनवणे, खरेदी विक्रीचे चेअरमन लहू पाटील, काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष अशोक सुडके, जिल्हा महिला अध्यक्षा गायत्री जयस्वाल,बाजार समितीचे संचालक रावसाहेब पाटील, ऋषीकेश ठाकरे,भाऊसाहेब पाटील, खरेदी विक्री संचालक बापू खैरनार, जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश गर्दे,तालुकाध्यक्ष हरीष पाटील,भैय्या बडगुजर आदी उपस्थित होते.

# 'हिरे' महाविद्यालयासह जिल्हा रुग्णालयासाठी २५ कोटी मंजूर

**धुळे । प्रतिनिधी**

श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे परीक्षा हॉल व लेक्चरर हॉलचे बांधकाम करणे, धुळे जिल्हा रुग्णालयातील १०० खाटांचे स्त्री व बाल रुग्णालयाचे बांधकाम करणे तसेच भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयातील शवविच्छेदन इमारतीच्या नुतनीकरण करणे या कामांसाठी पावसाळी अधिवेशनात २५ कोटी रुपयांचा निधी मंजुर झाला असल्याची माहिती आ. फारुख शाह यांनी दिली आहे.

धुळे शहरातील १०० खाटांच्या स्त्री व बाल रुग्णालयाच्या अतिरिक्त वाढीव कामासाठी महाराष्ट्र शासनाने पावसाळी अधिवेशनाच्या अर्थसंकल्पात ९ कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. धुळे शहरात शासनाचे एकही स्त्री व बाल रुग्णालय नसल्यामुळे शहरातील नागरिकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. शिवाय सदर १०० खाटांच्या रुग्णालयासाठी अनेक



राजकीय पक्षांनी वेळोवेळी आंदोलनेही आहेत. मात्र, आ. फारूक शाह यांच्या अथक प्रयत्नाने या कामासाठी पावसाळी अधिवेशनात अतिरिक्त निधी शासनाने उपलब्ध करून दिलेला आहे. तसेच हिरे मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी लेक्चरर हॉलची फार आवश्यकता होती, यासाठीही या पावसाळी अधिवेशनात उर्वरित अर्थसंकल्पात शासनाने मंजुरी दिलेली आहे. तसेच भाऊसाहेब हिरे मेडिकल कॉलेज येथील सुसज्ज असे अत्याधुनिक शवविच्छेदगृहाच्या कामासाठी सुद्धा शासनाने या अर्थसंकल्पात मंजुरी दिलेली आहे.

आ. शाह हे या कामासाठी प्रयत्नशील होते. त्याला आज मंजुरी मिळाल्यामुळे शहरवासीयांची मोठ्या प्रमाणात गैरसोय दूर होणार आहे.

# जवान श्रीराम गुजर अनंतात विलीन

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतीय सैन्यदलातील सुट्टीवर आलेला जवान श्रीराम राजेंद्र गुजर (वय २४) यांच्यावर धानोरे (ता. निफाड) येथे मंगळवारी (दि.१८) शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

श्रीराम हे भारतीय सैन्यदलात आसाम (गुवाहाटी) येथे बॉम्बे इंजिनिअर कोर २३६ युनिटमध्ये गेल्या सात वर्षांपासून शिपाई जहाज ऑपरेटर म्हणून कर्तव्यावर होते. श्रीराम यांच्या दुचाकीला रविवारी (दि. १६) अपघात झाला होता. अपघातानंतर उपचारादरम्यान सोमवारी (दि.१७) त्यांचे निधन झाले. देवळाली कॅम्प येथील आर्टिलरी सेंटरचे सुभेदार टी. क्रिस्टोपर यांच्या जवानांच्या तुकडीने व पंचक्रोशीतील माजी सैनिक, लासलगाव पोलिसांनी त्यांना अखेरची मानवंदना दिली. यावेळी फुलांनी सजविलेल्या सैन्यदलाच्या रथातून श्रीराम यांची घरापासून व गावातून अंत्ययात्रा काढण्यात आली.



अंत्ययात्रेत हजारोच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. 'ए मेरे वतन के लोगो...' या गीताची धून व 'भारत माता की जय','वंदे मातरम...', 'श्रीराम भैय्या,अमर रहे...' या घोषणा देत उपस्थित जनसागराने साश्रु नयनांनी श्रीराम यांना अखेरचा निरोप दिला. जवान श्रीराम यांचे आजोबा संतु गुजर, वडील राजेंद्र, आई अनिता, भाऊ नितीन, बहीण प्रियंकासह नातेवाईकांनी केलेला आक्रोश उपस्थितांचे मन हेलावून गेला. यावेळी भाऊ नितीन याने अग्निडाग दिला.

याप्रसंगी देवळाली कॅम्प ६ फिल्ड रेजिमेंटचे सुभेदार टी. क्रिस्टोपर, नायब सुभेदार मस्के, उपविभागीय अधिकारी हेमांगी पाटील, तहसीलदार शरद घोरपडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल वाघ, मंडळ अधिकारी संतोष डुंबरे, पोलीस निरीक्षक दौलत जाधव, बाळासाहेब पगारे, त्रिदल सैनिक संघाचे अध्यक्ष तुषार खरात, कॅप्टन मार्तंड दाभाडे, माजी पं.स.समिती सदस्य भाऊसाहेब बोचरे, माजी सरपंच विनोद जोशी, राष्ट्रवादीचे शाहू शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख प्रकाश पाटील, बाबासाहेब गुजर, पोलीस पाटील अरुण गुजर, योगेश झुरळे, केदारनाथ तासकर, अंकुश तासकर आदींसह पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जुगार अड्ड्याबद्दल तालुका पोलिस अनभिज्ञ कसे?

महिंदळे शिवारात चालणार्या एका पत्त्याच्या क्लबवर आयजींच्या पथकाने धाड टाकली. या कारवाईत सुमारे ३० लाखांचा ऐवज आणि ३१ जुगार्यांना जेरबंद करण्यात आले. एकिकडे एसपी संजय बारकुंड जिल्ह्यातील अवैध धंदे बंद असल्याचे सांगत असून दुसरीकडे खुलेआम पत्त्यांचे डाव खेळले जात असल्याचे कारवाईतून उघड झाले. त्यामुळे पोलीस दलाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होताच एसपी संजय बारकुंड यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी आणि कर्मचार्यांना फैलावर घेतले आहे. एलसीबीचे पीआय हेमंत पाटील यांच्याकडून तडकाफडकी एलसीबीचा पदभार काढून घेत त्यांची रवानगी नियंत्रण कक्षात होणार आहे.

गेल्या काही महिन्यात गंभीर गुन्ह्यांच्या डिटेक्शनचा जोरात धडाका लावला होता. त्यामुळे आरोपींच्या अटकेचे प्रमाण वाढले होते. पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी एलसीबीची धुरा सांभाळल्यापासून डिटेक्शनची ही गती प्रचंड वाढल्याचे मानले जात होते. त्यांच्या कामाच्या वेगळ्या पद्धतीमुळे अधिनस्त यंत्रणेनेही मरगळ झटकली. त्यांच्या वाढलेल्या कामाच्या गतीचे चांगले परिणामही अल्पावधीतच दिसू लागले होते. मात्र एलसीबीचे पीआय हेमंत पाटील यांच्याकडून तडकाफडकी एलसीबीचा पदभार काढून घेत त्यांची रवानगी नियंत्रण कक्षात होणार आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये कारवाईची दिवसभर चर्चा होती. मोराणे शिवारात चालणाऱ्या पत्त्यांचा क्लबच्या बाबतीत तालुका पोलिस अनभिज्ञ कसे होते. या बाबत देखील नागरिकांमध्ये चर्चा होती. नाशिक मधील पथक येऊन कारवाई करते. तरी देखील तालुका पोलीसांना याबाबत सुगावा देखील नाही हा देखील संशोधनाचा विषय झाला आहे. तसेच तालुका पोलीसांच्या दुर्लक्षामुळे मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी देखील वाढत आहे. तालुक्यातील अनेक गुन्हे दाखल होऊन देखील त्यांचा तपास होत नाही. यामुळे अनेक वेळा तालुका पोलिस स्टेशन विरोध अनेक नागरिक पोलिस अधीक्षक कडे तक्रार करता. मात्र तरी देखील तालुका पोलिस कोणत्याही गोष्टीसाठी गांभीर्य लक्षात घेऊन कारवाई करतांना दिसत नाही. अशी देखील चर्चा नागरिकांमध्ये होती.



### नेमके गौडबंगाल काय?

**एकूणच या प्रकारामुळे असे दिसून येते की जिल्हा पोलीस प्रशासनामध्ये मोठी खलबते झालेली आहेत किंवा होत आहेत, काही दिवसांपूर्वी झालेल्या कारवाईंमध्ये एसपी बारकुंड आणि एलसीबीचे पीआय हेमंत पाटील खांद्याला खांदा लावून कारवाई करीतांना दिसत होते आणि त्यानंतर अचानकच अशी वादग्रस्त परिस्थिती का निर्माण व्हावी, की पी आय पाटील यांची थेट नियंत्रण कक्षात नेमणूक करण्यात यावी, यामागचे नेमके गौडबंगाल काय ? असा प्रश्नही नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे. तालुका पोलिसांनी कर्तव्यात कसूर केल्याचे सिद्ध होते. असे असतानाही केवळ पीआय हेमंत पाटील यांच्यावर सरसकट खापर फोडणे चुकीचे आहे अशी चर्चा पोलीस दलात होती.**



शोध बातमी

पुरुषोत्तम पाटील

मुख्य उपसंपादक

मो.७०५७०१११२६

# पाचमौलीत तुफान हाणामारी, १६ जणांवर दंगलीचा गुन्हा

**साक्री । प्रतिनिधी**

तालुक्यातील बुरूडखे व पाचमौली ग्राम पंचायतींची विभागणी झाल्याने बुरूडखे ग्रामपंचायत येथील सामान पाचमौली येथे घेवुन जाण्याच्या कारणावरून १६ जणांच्या जमावाने महिलेसह सात जणांना बेदम मारहाण केल्याची घटना दि.१३ जुलै रोजी सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास घडली.

मिराबाई सुरेश साबळे रा.बुरूडखे, ता.साक्री यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, बुरूडखे व पाचमौली ग्राम पंचायतींची विभागणी झाल्यामुळे दि.१३ जुलै रोजी सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास बुरूडखे ग्राम पंचायत कार्यालयातील सामान नेण्याकरीता पती सुरेश साबळे, कैलास जगताप, कमलबाई दिलीप जगताप, निर्मला अनिल जगताप, शकुंतला संजय जगताप, कनुबाई साहेबराव जगताप सर्व रा.बुरूडखे यांचेसह गेले असता विनीत रामचंद्र साबळे यांनी वाद घालण्यास सुरूवात केला. या वादाचे पर्यावसाण हाणामारीत झाले. त्याने पती सुरेश साबळे यांच्या डोक्यावर लाकडी खुर्ची मारली. या फिर्यादीवरून साक्री पोलीस ठाण्यात वरील १६ संशयितांवर भादंवि गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

## राजधानीतील प्रलय

नदीपात्रालगतच्या बेकायदा वसाहती, नदीमध्ये प्रमाणाबाहेर साचलेला गाळ आणि त्याबद्दल प्रशासनाची डोळेझाक किंवा उदासीनता, यातून दिल्लीवर संकट कोसळले.

राजधानीला पुराने वेढा दिला. दिल्लीतील महापूर अनेक प्रश्नांना जन्म देणारा आहे. कोणत्याही आपत्तीपासून राजधानी सुरक्षित राहील, असे नियोजन आवश्यक असते. हे नियोजन होते का? आणि असले तर ते कागदोपत्री राहिले! राज्य आणि केंद्रामध्ये अपेक्षित असलेल्या समन्वयाचे काय? दिल्ली पाण्यात गेल्यावर आता आरोप - प्रत्यारोपांचे सत्र सुरु झाले आहे. संकटाला योग्य रीतीने तोंड देता आले नाही, की याप्रकारे एकमेकांवर जबाबदारी ढकलण्याची स्पर्धा सुरु होते. दोष आपल्यावर येऊ नये यासाठी यंत्रणा दक्ष असतात! ती दक्षता आधीपासून घेतली गेल्यास आपत्ती रोखता येणे शक्य असते, हे कोणाच्याही गावी नसते. किमान राजधानीचा कारभार याला अपवाद असावा, अशी अपेक्षा होती. मात्र, यमुनेच्या पाण्याबरोबर ती वाहून गेली आहे. राजघाट, सर्वोच्च न्यायालयाचा परिसर, लाल किल्ला, इंडिया गेट, मयुर विहार यांसह अनेक ठिकाणी यमुनेच्या पुराचे पाणी गेले. दिल्लीतील मुकुंदनगर भागात तीन मुलांना प्राण गमवावे लागले. दैनंदिन गरजांसाठी पुराच्या पाण्यातून वाट काढण्याची वेळ सर्वसामान्य नागरिकांवर आली. राजधानीतील पर्यटनस्थळे पाण्याखाली, हे दृश्य देशाला नवीन होते. लष्कराला मदतीला बोलाविण्याची वेळ आली, यातून तेथील स्थितीचे गांभीर्य स्पष्ट होते. सांडपाणी वाहिनीच्या बिघडलेल्या नियंत्रकाच्या दुरुस्तीचे काम स्थानिक प्रशासनातील कोणी नव्हे, तर लष्करी जवानांनी पार पाडले, यातच प्रशासनाची ताकद दिसली! सिंघूसह चारही सीमांवरून येणारी अवजड वाहने बाहेरच रोखण्याची वेळ आली.

यमुना कोपली

गेल्या पन्नास वर्षांमध्ये यमुना नदी एवढी कोपली नव्हती. यमुनेची पातळी २०८ मीटरवर पोहोचली. दिल्लीत अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखाली आम आदमी पक्षाचे सरकार आहे. केंद्रातील आणि हरयानातील भाजप सरकार आणि दिल्ली सरकार यांच्यात पुराच्या जबाबदारीवरून एकमेकांवर आरोप सुरु आहेत. दिल्ली प्रशासनातील अधिकार्यांचे सहकार्य मिळाले नाही, असा आरोप आम आदमी पक्षाचे मंत्री सौरभ भारद्वाज यांनी नायब राज्यपाल व्ही.के. सक्सेना यांच्याच उपस्थितीत केला. 'ही वेळ राजकारणाची नाही, पूरस्थिती नियंत्रणात आणणे महत्त्वाचे आहे' अशा शब्दांमध्ये नायब राज्यपालांनी भारद्वाज यांना खडसावले. दिल्लीत विक्रमी पाऊस झाला ही वस्तुस्थिती; पण पावसाचा जोर कमी झाल्यावरही यमुनेच्या पाण्याची पातळी वाढत होती. हरयानातील हथनीकडी धरणातील पाणी उत्तर प्रदेशात पाणी नेणार्या कालव्यांमध्ये न सोडता यमुनेत सोडण्यात आले. त्यातूनच दिल्लीत पूर आला, असे आम आदमी पक्षाचे म्हणणे आहे. केजरीवाल यांची बदनामी व्हावी यासाठी हरयाना सरकारने ते जाणूनबुजून केले, असा आरोप केला जात आहे. या आरोपाला प्रत्युत्तर देताना भाजपने, यमुनेच्या विकासासाठी असलेल्या ६८०० कोटी रुपयांच्या निधीचे काय झाले? असा सवाल केला. यमुनेला स्वच्छ करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने १९९४ मध्ये दिले. त्यानंतर जे जे सरकार आले त्यांनी निधी खर्च केला, यमुनेचे प्रदूषण तसेच राहिले! २०१७ पर्यंत यमुना नदीचे पुनरुज्जीवन करण्याचा कार्यक्रम आखला गेला. तोही वार्यावर विरल्यात जमा आहे. या असंवेदनशीलतेला सर्वच राजकीय पक्ष जबाबदार आहेत. राष्ट्रीय हरित लवादाने यमुनेच्या प्रदूषणाबद्दल वेळोवेळी नाराजी व्यक्त केली, त्याचाही उपयोग झाला नाही. नदीच्या काठावर प्रचंड प्रमाणात अतिक्रमणे झाली आहेत. नदीपात्रालगतच्या बेकायदा वसाहती, नदीमध्ये प्रमाणाबाहेर साचलेला गाळ आणि त्याबद्दल प्रशासनाची डोळेझाक किंवा उदासीनता, यातून दिल्लीवर संकट कोसळले. दिल्लीतील सुमारे २३ लाख नागरिक यमुनेच्या काठालगत राहतात, असा अंदाज आहे. नदीकाठच्या जागा बांधकाम व्यावसायिकांसाठी अलोट पैसा देणारा मार्ग बनला आहे. संरक्षित नदीपात्र, ही संकल्पनाच धाब्यावर बसविली गेल्याने काठालगतच नाही, तर सर्वत्र हाहाकार उडाला. यमुनेभोवती पडलेला प्रदूषण आणि अतिक्रमणांचा विळखा उठला तरच पुढच्या काळात अनर्थ टाळता येईल. त्यासाठी राजकीय स्वार्थाचे यमुनेच्या पाण्यात विसर्जन करावे लागेल. ती शक्यता दूरवर दिसत नाही.

# मराठवाड्यात खरिपाची साठ टक्के पेरणी



यंदा उशिरा पाऊस दाखल झाल्यामुळे मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये खरीप हंगामाची पेरणी रखडली आहे. विभागातील एकूण पेरणी क्षेत्रांपैकी आतापर्यंत ५० लाख २६ हजार ४२ हेक्टर पेरणी क्षेत्रापैकी केवळ ३० लाख ९४ हजार ८३ हेक्टर क्षेत्रावर म्हणजेच फक्त ६० टक्के पेरणी झाली असल्याची माहिती कृषी विभागाकडून प्राप्त झाली आहे. यात लातूर विभागात ५० टक्के, तर छत्रपती संभाजीनगर विभागात ६२ टक्के पेरणीचा समावेश आहे. मराठवाड्यात पावसाने मोठा ताण दिला असून खरीप पेरणी हंगामच धोक्यात आला आहे.

पावसाळा सुरू होऊन दीड महिना उलटला. मराठवाड्यात आतापर्यंत १३५ मिलिमीटर सरासरी पाऊस पडला आहे. रोहिणी, मृग नक्षत्र कोरडेठाक गेल्यामुळे मराठवाड्यातील सर्वच विभागांत पेरणी रखडली होती; परंतु गेल्या आठवड्यात मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये पाऊस पडण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे खर्‍या अर्थाने गेल्या आठवड्यात प्रत्यक्षात पेरणीला सुरुवात झाली. छत्रपती संभाजीनगर कृषी सहसंचालक कार्यालयांतर्गत तीन जिल्ह्यांचा समावेश आहे. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड या तीन जिल्ह्यांचे एकूण पेरणी क्षेत्र २० लाख ९० हजार ११८ हेक्टर आहे. यापैकी आतापर्यंत सात लाख ९ हजार ५७२ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाल्याची नोंद कृषी विभागात करण्यात आली आहे. यामध्ये सर्वाधिक क्षेत्र चार लाख पंधरा हजार ९६० हेक्टरवर कपाशीची लागवड करण्यात आली. मका ९२ हजार ७०९ हेक्टर, तूर ३७ हजार हेक्टर व इतर खरीप पिकांचा समावेश आहे. लातूर विभागातील लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली असे एकूण सरासरी पेरणी क्षेत्र २९ लाख ३५ हजार ८४४ हेक्टर आहे. यापैकी ५ लाख १५ हजार ६११ हेक्टर क्षेत्रावर म्हणजेच ५० टक्के पेरणी झाली आहे. यामध्ये लातूर विभागात सर्वाधिक दोन लाख ९९ हजार अठरा हेक्टर क्षेत्रात सोयाबीनचा पेरा आहे. त्यानंतर दोन लाख सतरा हजार ९९० हेक्टरवर कपाशीची लागवड झाली आहे. यानंतर बाजरी, तूर, मूग, उडीद, मका, भुईमूग आदी पिकांचा समावेश आहे. प्रत्यक्षात काही पिकांच्या पेरणीचा कालावधीदेखील संपुष्टात आल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. येत्या तीन-चार दिवसांत पाऊस न झाल्यास अनेक ठिकाणी खरिपाची पेरणीच धोक्यात येणार आहे. यंदाच्या खरीप हंगामासाठी मराठवाड्यात ८५ टक्के बियाणांचा पुरवठा झाला.

दरम्यान, मराठवाड्यातील नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाजारपेठेत गेल्या तीन वर्षांत पहिल्यांदाच हळदीला तेजी आली आहे. हळदीची पहिली बोली तब्बल १४ हजारांवर आल्याने हळदीचे उत्पादन घेणार्‍या शेतकर्‍यांनी आनंद व्यक्त केला. शेवटचा भाव दहा हजार रुपये प्रतिक्विंटल आल्याने हळदीचे शेतकरी आनंदात आहेत. मराठवाड्यासह नांदेड, हिंगोली जिल्ह्यात हळद पीक घेणारे शेतकरी मोठ्या प्रमाणात आहेत. कापूस व सोयाबीनला म्हणावा तसा भाव मिळत नसल्याने शेतकर्‍यांचे सर्व लक्ष हळद या पिकाकडे लागले होते. हळदीचे पीक शेतकर्‍याला तीन वर्षांत एकदा पिवळे करते, अशी म्हण प्रचलित आहे. त्याप्रमाणेच शेतकर्‍याला हळदीने पिवळे केल्याची चर्चा या भागात होत आहे. राज्य सरकारने एक रुपयात पीक विमा काढून देण्याची सोय केल्यामुळे शेतकरी वर्ग यंदा पीक विम्याच्या त्रासातून लवकर मुक्त होत आहे. महाराष्ट्र शासनाने प्रतिविमा चाळीस रुपये सीएससी सेंटर चालकाला देऊ केले आहेत. त्यामुळे सीएससी सेंटर चालकांनी अतिरिक्त पैसे घेऊ नयेत, असे त्यांना आदेश देण्यात आलेले आहेत; परंतु त्या आदेशाला न जुमानता काही सेंटर चालक शेतकर्‍यांकडून प्रति विमा शंभर रुपये घेत आहेत. मराठवाड्यातील अनेक सेंटरवर हे चित्र दिसून येत आहे.

मराठवाड्यातील शेतकरी अजूनही पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. कोकण, मुंबई, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा असा हा पावसाचा प्रवास असतो. येत्या चार-पाच दिवसांत मराठवाड्यात अधिक जोमाने पावसाचे आगमन होईल, असा अंदाज हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. पेरणीयोग्य पाऊस पडला नाही तर खरिपाच्या पेरण्या आर्द्रा नक्षत्रात पूर्ण होण्याची शक्यता आहे. खरीप पिकांची पेरणी करताना शेतकरी बांधवांनी कमीत कमी १०० मिलिमीटर पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये. तसेच जमिनीमध्ये पेरणी करण्याइतकी ओल झाल्याशिवाय पेरणी करू नये. आवश्यक असलेले बियाणे शासनमान्य अधिकृत विक्री केंद्रातूनच खरेदी करावे तसेच पेरणी करावयाच्या बियाणांची योग्य हाताळणी करून त्याची चांगली उगवण होण्यासाठी योग्य तितक्या खोलीवर बियाणांची पेरणी करावी, असे आवाहन राज्याच्या कृषी आयुक्तांनी केले आहे. महागड्या बियाणांची ओल नसताना जर पेरणी केली आणि जर पाऊस सुरू होण्यास विलंब झाला, तर पेरणी केलेल्या बियाण्यांच्या उगवणीवर प्रतिकूल परिणाम होऊन बियाण्यांची उगवण होणार नाही. त्यामुळे शेतकर्‍यांचे आर्थिक नुकसान होऊन त्यांच्यावर दुबार पेरणी करण्याची वेळ येण्याची शक्यता आहे.

मागील पाच वर्षांपासून मराठवाड्यातील काही भागांत अतिवृष्टी होत आहे. अतिवृष्टीने चांगले आलेले पीक शेतकर्‍यांच्या डोळ्यांदेखत गेले होते. दरवर्षीच्या अतिवृष्टीने शेतकरी पूर्ण खचला आहे. यावर्षी तरी शेती साथ देईल, या आशेवर तो जगत आहे. मराठवाड्यात मागील अनेक वर्षांपासून कापसाचे क्षेत्र कमी करून शेतकर्‍यांनी सोयाबीन पिकाचे क्षेत्र वाढवले आहे. मात्र दरवर्षी तेच पीक जमिनीत घेत असल्याने सोयाबीनचा उतारा कमी येत आहे. त्यातच अतिवृष्टीने सोयाबीनचे नुकसान होत आहे. नगदी पिकात सोयाबीन पिकालाच याही वर्षी पसंती दिली आहे. उडीद व मुगाचे क्षेत्र सोयाबीनच्या मानाने अत्यल्प राहणार असल्याचे दिसून येत आहे. ज्या शेतकर्‍यांनी कापसाची लागवड करणे सोडून दिले होते, ते कापसाची लागवड करण्यास उत्सुक आहेत. मात्र कापसाची लागवड किती प्रमाणात होईल, हे सांगणे अवघड असले तरी गतवर्षीच्या तुलनेत कापसाचे क्षेत्र वाढण्याची शक्यता आहे.

मराठवाड्यात अद्यापही १९ लाख ५२ हजार २१० हेक्टर क्षेत्रात पेरण्या बाकी आहेत. पीकनिहाय पेरणीची स्थिती लक्षात घेता एकाही पिकाची सरासरी क्षेत्रा इतकी पेरणी झाली नाही. तूर, उडीद, मुगाची तसेच खरीप ज्वारी- बाजरीची पेरणी झाली असली तरी सध्या या भागात पाऊस आला तरी पिकांची वाढ होईल की नाही, अशी स्थिती आहे. पाऊस लांबणीवर पडत आहे. त्यामुळे शेतकर्‍यांची अवस्था ही चलबिचल होत आहे. पेरणी झालेल्या भागांत पावसाने दडी मारल्यामुळे अनेक शेतकर्‍यांना दुबार पेरणीची वेळ येत आहे. दरम्यान, लातूर जिल्ह्यात ६१ टक्के पेरण्या झाल्या आहेत, तर धाराशिव जिल्ह्यात ४१ टक्के, नांदेड जिल्ह्यात ६०, परभणी ६३, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ७३ टक्के, तर जालना जिल्ह्यात ५४, हिंगोली जिल्ह्यात ६३, बीड जिल्ह्यात ६० टक्के पेरण्या झाल्या आहेत. कृषी विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार पेरणीचे क्षेत्र पाहता मराठवाड्यातील धाराशिव जिल्ह्यात सर्वसाधारण क्षेत्राच्या तुलनेत सर्वात कमी, तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सर्वसाधारण क्षेत्राच्या तुलनेत सर्वाधिक पेरणी झाली आहे.

**- मराठवाडा वार्तापत्र : अभयकुमार दांडगे**

# अभियांत्रिकीमध्ये करिअर घडवताना शाखा, महाविद्यालये विचार करून निवडा

**अभियांत्रिकी, अर्थात इंजिनीअरिंग शिक्षणाविषयी वाटणारं आकर्षण आपल्याकडे आजही कायम आहे. अभियांत्रिकी हे करिअरसाठी नेहमीच सर्वात प्रमुख क्षेत्र आहे. अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या जागादेखील वाढताना दिसतायत, काही कारणांमुळे अभियांत्रिकी पदवीधरांना मुख्यत्वे समस्या भेडसावत आहेत. कारणांचे विश्लेषण केल्यावर आम्हाला असे कळाले की पदवीधरांनी शैक्षणिक माध्यमातून साध्य केलेले कौशल्य आणि उद्योगांच्या गरजा यांत अंतर आहे अभियांत्रिकी पदवीधरांकडून काही**



**विलक्षण कौशल्य, उद्योगाभिमुख दृष्टीकोन आणि तंत्रज्ञानाची अपेक्षा आहे.**

राज्यनिहाय नोकर्‍यांच्या उपलब्धतेच्या आकडेवारीचा विचार करता महाराष्ट्रात सर्वाधिक नोकर्‍यांची मागणी व रोजगार उपलब्ध आहेत (१९.७२%), त्यानंतर दिल्ली छठउ (१६.९९%), कर्नाटक (१६.०३%) आणि तामिळनाडू (९.८०%).इंडस्ट्री नवीन पदवीधरांना प्रशिक्षण देण्यासाठी त्यांची संसाधने खर्च करत आहे कारण त्यांना आवश्यक ते ज्ञान द्यायचे आहे, ह्याचा थेट अर्थ असा आहे की ते अशा व्यक्ती शोधत आहेत ज्यांच्याकडे आवश्यक कौशल्य आहेत . सॉफ्टवेअर डेव्हलपर (९.७४%) आणि विक्री व्यावसायिक (८.१७%) हे भारतातील सर्वाधिक मागणी असलेले व्यावसायिक क्षेत्र आहेत. ह्याव्यतिरिक्त इतर डोमेन जसे इंटरफेस डिझाइन आणि खेढ,आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, बिग डेटा ॲनालीटीकस ,सायबर सिक्युरिटी, क्लाउड कॉम्प्युटिंग, डिजिटल मार्केटिंग,मशीन लर्निंग ह्या क्षेत्रात देखील मागणी आहे. पण अशा वेळी स्वाभाविकच मनात प्रश्न उभे राहतात, की खरंच इतक्या अभियंत्यांची आवश्यकता आहे का? इंजिनीअरिंग म्हणजे काय? किती विद्याशाखांतून हे शिक्षण घेता येतं? इंजिनीअरिंगविषयी मनातील सर्व प्रश्नांना उत्तर देणारा हा खास लेख...



**डॉ. अमोल पोतगंटवार
संचालक, स्कूल ऑफ कॉम्पुटर सायन्सेस अँड इंजिनीरिंग (SOCSE), संदिप विद्यापीठ, नाशिक**

इंजिनीअरिंगला जाऊ इच्छिणाऱ्या बहुतांश विद्यार्थ्यांमध्ये विविध विद्याशाखांबाबत अनभिज्ञता असते. नेमकी कोणती विद्याशाखा निवडायची, त्या शाखेतून पुढे नोकरीच्या नेमक्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत हे जाणून घेणं महत्त्वाचं आहे. आपल्या विषयातल्या आवडीनुसार व क्षमतेनुसार शाखेची निवड करावी. अधिक क्षेत्रात रोजगारांच्या संधी हव्या असल्यास मूळ शाखांची निवड योग्य ठरतं. (उदा. सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, केमिकल) स्पेशलाइज्ड शाखांची निवड पदवीच्या वेळेस केल्यास आपल्या रोजगाराच्या संधी त्या शाखेपुरत्याच मर्यादित राहतात. उदा. ऑटोमोबाइल इंजिनीअरिंग शाखेची निवड केल्यास केवळ वाहन उद्योगापुरतच्या नोकरीच्या संधी मर्यादित राहतात. त्याऐवजी मेकॅनिकल इंजिनीअरिंगची निवड केल्यास पुढे एरोस्पेस, मरिन, ऑटोमोबाइल, रेफ्रिजरेशन, प्रॉडक्शन, ऑटोमेशन यांसारख्या अनेक इंजिनीअरिंग क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकीमध्ये प्रवेश घेताना विचार करून महाविद्यालय निवडावे. जेणेकरून विद्यार्थ्यांना बहुराष्ट्रीय कंपनी मध्ये प्लेसमेंट होऊन चांगल्या पगाराची नोकरी मिळेल तसेच उद्योजकता व नाविन्यपूर्ण प्रकल्प करण्यासाठी प्रोत्साहन व सहकार्य मिळेल.महाविद्यालय आणि आवडणारी शाखा यांचे योग्य नियोजन करूनच निर्णय घ्यावा आणि अर्ज भरताना पसंतीक्रम या पद्धतीने भरावा,असे आवाहन डॉ. अमोल पोतगंटवार, संचालक, डजउडए, संदिप विद्यापीठ, नाशिक यांनी केले.

**विद्यार्थ्यांना टिप्स:**

सीईटी, नीट, जेईई आणि बारावीच्या गुणांचा विचार करून योग्य क्षेत्राची निवड करा.

मोठ्या पगाराच्या नोकरीसाठी कौशल्य विकास गरजेचा.

अभियांत्रिकीचे शिक्षण घेताना ऑनलाईन तसेच ऑफलाइन इंटर्नशिप प्रकल्पांवर भर द्यावा.

बीसीए, एमसीए, कॉम्पुटर सायन्स मध्ये बहुराष्ट्रीय कंपनीत रोजगारांच्या अनेक संधी.

पालकांनी मुलांची आवड बघुन त्यांना क्षेत्र निवडीसाठी मदत करावी.

## शब्दकोडे-१२४



आडवे शब्द

१. स्वामी विवेकानंद यांचे जगप्रसिद्ध भाषण येथे झाले ४. प्रस्तावनेतच वेळ घालवणे (वा.प्र.) १३. गुरुद्वारातील अन्नछत्र १४. रतीचा पती १५. रोख रक्कम १६. तलाव १७. गहिवरणे १९. जोंधळ्याची वाळलेली ताटे २१. भ्रमर २३. कागद मोजण्याचे एक माप २५. अनौरस (हिंदी) २७. महिना २८. शिळ्या ताकाची चव २९. गायीचे पिल्लू ३१. रामकथा ३२. हाक ३३. पत्नी ३५. माणूस ३६. परमेश्वर ३८. तापाची चाहूल ४०. मृग ४१. दाब (इंग्रजी) ४२. अतिशय श्रम ४३. भाव, किंमत ४६. शांत ४८. आशीर्वाद ४९. मोटार ५०. शक्ती ५१. प्राण, जीव (हिंदी) ५३. ढोंगी एकाग्रता ५५. पैठणची प्रसिद्ध साडी ५६. घड्याळातील तिसरा काटा ५७. निर्मनुष्य, ओसाड ५९. सर्वांत कमी किमतीचे जुने नाणे, एक आडनाव ६०. केसाचा कृत्रिम रंग ६१. निबर, जून ६५. गायनकला सांगणारा वेद ६६. एक श्वासरोग ६८. जो संकटाला घाबरतो त्याच्यावरच ती ओढतात (म्हण) ७२. क्रिकेटमधील धावपळ ७३. साधना करणारा ७४. प्रचलित बोधवाक्य ७५. आक्षेप ७८. वडिलांचे संबोधन ८०. वेखंड ८१. आणि ८२. दिवस ८३. प्रशंसेचा उद्गार ८४. सान्निध्य ८५. नेता ८६. ऋतु, हंगाम ८७. तोंड (सं.)

उभे शब्द

१. सीमोल्लंघन २. ज्यावर छापतात तो ३. निर्धन लोक ४. मऊ पडणे ५. रग, मस्ती ६. शिखांचे गुरु ७. घरगुती संबंध ८. टपाल ९. शेख-चुरमुरे इ. विकणारा १०. आभा ११. कपाळ १२. चिंचगुळ घालून केलेली काकडी वगैरेची कोशिंबीर १८. ओलसर २०. शंकराचे वाद्य २२. गुरांना चरण्यासाठीचे कुरण २४. तमाशातील प्रश्नोत्तरे २५. आवाज, छंद २६. समुदाय २७. व्यंकटेश माडगूळकरांची 'माणसे' या भागातील २८. लग्नात द्यायची वरदक्षिणा ३०. मालिका, ठराविक कालावधी ३२. तात्पुरता लाकडी पूल ३४. संकट ३७. वरपांगी ३९. कमतरता ४०. उगीचच ४१. माया, स्नेह ४३. प्रत्येक ४४. आळशी, अजागळ ४५. धर्मार्थ देणे ४६. शंकराचे एक नाव ४७. उणे ४८. जंगल ४९. बायका साडी घेताना रंग, पोताबरोबर या दोन गोष्टी बघतात ५०. निवारा (हिंदी) ५२. आभाळ ५३. शहरी सार्वजनिक वाहन ५४. एखादी गोष्ट मिळवण्यासाठी पाठपुरावा करणे ५५. पलीकडे ५८. झाडझूड करणारा नोकर ६०. कमळांचे तळे ६२. देवीचा उपासक ६३. देवपूजेचे पात्र ६४. कोर्टातील जबानी ६७. श्रीकृष्णाचे एक नाव ६८. पुरुषांच्या कानातील दागिना ६९. पर्ण ७०. लग्न न केलेला ७१. एकत्र वास्तव्य ७३. भक्ष्य ७६. दाक्षिणात्य पाणीदार आमटी ७७. डोळे ७९. कुबड ८०. नवरी ८३. वर्ण, रंग

### शब्दकोडे १२३ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.ठाम ३.राजबिंडा ६.अंतकाल ९.कदम १२.रजत १४.नदी १५.गल १६.ताव मारणे १८.बलभीम १९.वास २०.मन २२.सल २३.सिंगार २६.यमन २८.रावबहादूर ३०.गजानन ३१.वातायन ३२.सारा ३३.कृण ३४.रात ३५.माह ३८.पंकज ३९.सजग ४०.मतलबी ४२.परात ४४.निरामय ४५.गरजवंत ४७.काष्ठ ४८.व ४९.दामट ५१.मात ५२.नराधम ५३.असूया ५५.रग ५७.बरणी ५८.रुपे ६०.चरक ६२.रजनी ६४.पलक ६५.उपकारक ६७.मानिनी ६८.कयाधु ६९.तारक ७१.मचलका ७३.विप्र ७५.अ ७६.कर ७७.नागरमोथा ७९.प्रकांड ८०.टाकणखार ८१.रसद ८२.सतत

**उभे उत्तर**

१.ठार बहिरा २.मजल ४.जन ५.बिंदी ६.अंग ७.तलम ८.लता ९.कमाल १०.दर ११.मणेर १३.तभी १७.वसनवात १९.वार २१.नयन २३.सिंदूर २४.गार २५.अजाण २७.जयविजय २९.वसाहत २९अ.बरा ३०.गपचूप ३४.राजनिष्ठा ३५.मामलेदार ३६.डबीर ३७.कृपावंत ३८.पंत ३९.समयसूचकता ४१.लगट ४३.रातराणी ४६.जमा ४७.कामरुप ५०.मगर ५२.नरकयातना ५४.यार ५६.कनीनिका ५७.बलक ५९.पेकाट ६१.कनक ६३.जमालगोटा ६६.कुमुदिनी ७०.रमाकांत ७२.पारखा ७३.विरस ७४.प्रमोद ७६.कण ७८.गर ७९.प्रत

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# रोटरी क्लब ऑफ नासिक अंबडचा पदग्रहण सोहळा उत्साहात




**नाशिक । प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ नासिक अंबडचा ३० वा पदग्रहण सोहळा नुकताच हॉटेल बीएलव्हीडी येथे संध्याकाळी ६.३० वाजता संपन्न झाला. कार्यकमाचे प्रमुख अतिथी माजी प्रांतपाल शब्बीर शाकीर, सहाय्यक प्रांतपाल मनिष चिंधडे या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत मावळते अध्यक्ष नितीन थोरात यांच्याकडून मंगेश साकुरीकर यांनी अध्यक्षपदाची सुत्रे स्वीकारली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन हेमंत पाटील यांनी केले. नविन संचालक मंडळात चारूदत्त रायते सचिव, निवृत्ती गाजरे खजिनदार, निलकंठ निकम उपाध्यक्ष, गौरव चौधरी उपसचिव, डायरेक्टर म्हणुन विपुल लोढीया, उमाकांत कोठावदे, जोतीराव वाघ, कॅप्टन रत्नाकर बारीक, अरूण साकुरीकर, मेजर डी. के. झरेकर, ज्ञानेश्वर गोपाळे, विवेक पाटील, एम. जी. चंद्रसेकर, भास्कर पवार, डॉ. धनंजय आहिर, डॉ. अजित भामरे यांचा समावेश आहे. तर सल्लागार मंडळात दादा देशमुख, जे. एम. पवार, सुरजीत सिंग आनंद, टी. एच. पाटील, मेजर ए.आय. पिल्लई यांचा समावेश आहे.

नविन चालु वर्षात सेवा व मैत्री भाव या रोटरीच्या दोन मुख्य उद्दिष्टांच्या आधारे विविध समाजोपयोगी उपक्रम राबवण्यात येतील. गरजू शालेय विद्यार्थीनींकरिता शैक्षणीक मदत, विविध रोग तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे, पर्यावरणविषयक शिबिरे, माती पुनरूत्पादन शिबिरे, मोतीबिंदु शस्त्रकिया असे विविध उपक्रम राबवण्याचा त्यांचा मानस आहे.

या कार्यक्रमात डॉ. राहुल पाटील, चेतन कोठावदे, जयंत पवार, दिपक तावडे, प्रसाद जाधव, डॉ. मनोज चोरडीया, वसंत निबाळकर, रमेश बोरस्ते, हिमांशू कनानी, नानेकराम दंडवनी, प्रदिप लोढीया, संतोष मंडलेचा, संतोष भट हे रोटरी क्लब अंबडचे सभासद उपस्थित होते. तसेच माजी प्रांतपाल रमेश मेहेर, डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी अंजली मेहता, डिस्ट्रिक्ट ऑफीसर रणजीत साळवी, रोटरॅक्ट क्लब ऑफ नाशिक युथफोर्सचे सिध्दी आंबेकर, साहिल राका, रोटरी क्लब ऑफ स्मार्ट सिटीचे माजी अध्यक्ष तुषार चव्हाण, सहाय्यक प्रांतपाल स्वाती चव्हाण उपस्थित होते.

## सोमवती अमावस्यानिमित्त त्र्यंबकनगरी भाविकांच्या गर्दीने फुलली

**नाशिक ।** येथे गेल्या दोन ते तीन दिवसांपासून भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी वाढल्याचे चित्र दिसत आहे.अशातच सोमवती अमावस्याअसल्याने त्र्यंबकनगरी भाविकांच्या गर्दीने फुलून गेल्याचे पाहायला मिळाले. यावेळी भगवान त्र्यंबकराजाच्या दर्शनासाठी मंदिराच्या पूर्व दरवाजाकडे भाविकांच्या लांबच-लांब रांगा लागल्याचे चित्र त्र्यंबकमध्ये दिसत आहे. तसेच अनेक भाविकांनी आज सकाळी कुशावर्तावर स्नानासाठी गर्दी केली होती. याशिवाय अनेकांनी पूजाविधी करून दानधर्म देखील केले. तर काही भाविकांनी पूजाविधी करून देवाकडे संकटे दूर व्हावी अशी प्रार्थना देखील केली. दरम्यान, दुसरीकडे पूर्व दरवाजा परिसर, शिवनेरी धर्मशाळेसह आजूबाजूच्या परिसरात मोठी अस्वच्छता असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे पावसाळ्यात वाढणाऱ्या आजारांबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे. याशिवाय अनेकांनी पूजाविधी करून दानधर्म देखील केले.

# उद्योग क्षेत्राला प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी निपम कटीबद्ध- बारी

## निपमची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात



**नाशिक । प्रतिनिधी**

उद्योग व व्यवसाय क्षेत्राला प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सनल मॅनेजमेंट (निपम) सदैव प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन निपमचे नाशिक शाखेचे अध्यक्ष प्रकाश बारी यांनी केले. ते संदीप फाऊंडेशन येथे निपम व संदीप युनिव्हर्सिटी व संदीप फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एचआर कॉनक्लेवमध्ये बोलत होते.

यावेळी निपमचे सरचिटणीस हेमंत राख, निपमचे माजी अध्यक्ष डॉ. उदय खरोटे, खजिनदार विनायक पाटील, उपाध्यक्ष राजाराम कासार, उपाध्यक्ष राहुल बोरसे, सहसचिव प्रकाश गुंजाळ, रमेश गवळी, राजेंद्र आचारी, तुषार मोहीम, सुस्मित दळवी, मनोज मुळे, ओझरकर, संदीप फाउंडेशनचे एचडी प्रा. विवेक निकम, प्राचार्य डॉ. मिलिंद पाटील, प्राचार्य डॉ. दीपक पाटील, प्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बोरसे, प्राचार्य पंकज धर्माधिकारी, डायरेक्टर डॉ. अमोल पोटगंठवार, अधिष्ठाता डॉ. प्रकाश बुराडे, डॉ. रूपाली खैरे, डॉ. विभा कपूर, डॉ. भावना कडू, डॉ. निसार ऋषी आदी उपस्थित होते.

निपमचे सरचिटणीस हेमंत राख यांनी निपमतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. डॉ. उदय खरोटे यांनी संदीप फाउंडेशन व संदीप युनिव्हर्सिटी व नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सनल मॅनेजमेंटच्या वतीने आयोजित एचआर कोन्क्लेवमध्ये उपस्थितांना मार्गदर्शन करताना भविष्यात अशा प्रकारचे जास्तीत-जास्त उपक्रम आयोजित करावेत, त्यातून विविध उपक्रमांना चालना देण्यात येईल असे त्यांनी सांगितले. संदीप विद्यापीठाचे व्यवस्थापन संचालक मंडल व सर्व एचआर मॅनेजरचे स्वागत हेमंत राख व डॉ. रुपाली खैरे यांनी केले. या एचआर कोन्क्लेव्हमध्ये नामवंत कंपन्यांचे एचआर मॅनेजर्स सहभागी झाले होते.यावेळी निपमचे माजी अध्यक्ष डॉ.उदय खरोटे, ॲड. एस. एस. खैरनार, दिलीप महाले, पोपटराव सावंत, अशोक घुले, शरद बराटे, व्ही. बी. डांगरे, सुधीर पाटील, रवींद्र चौबळ, डॉ. अशोक सोनवणे आदींचा निपमच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास पवन मगजी, सुधीर देशमुख, ऋषिकेश आहेर, विनय मोरे, नितीन मगर, संजय पाठक, राजू माने, गोविंद बोरसे, गिरीष मालपुरे, मकरंद कुलकर्णी आदीसह १०० हून अधिक निपमचे आजी-माजी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

---

प्रोसेस जमा — ॲड. तुकाराम एन. मासुळे
निशाणी नं.६

### जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) सो. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ८६२/२०२३

१) सुलोचना चंद्रशेखर काळे उ.वय-३४, धंदा-घरकाम,
रा.हनुमान मंदिर जवळ, अयोध्यानगर, मालेगांव, ता.मालेगांव, जि. नाशिक, ह.मु. अवधान ता. जि. धुळे
२) आशा सोपान कदम उ.वय-३२, धंदा-घरकाम,
रा. देवघाट, ता. मालेगांव, जि. नाशिक ....अर्जदार
विरुध्द
कुणीही नाही ...सामनेवाला
कै. शोभाबाई आसाराम पाटील (सोनवणे) ...मयत

**कायदेशिर वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी**
Legal Heirship Certificate

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी मयत कै. शोभाबाई आसाराम पाटील (सोनवणे) यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम ८ अन्वये वारस दाखला मिळणेकामी सदरचा दि.कि. अर्ज धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. (कनिष्ठ स्तर) कोर्ट नं. यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता चौ. ता. दि. १९/०८/२०२३, ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतकास, वारसांना व इतर संबंधीतांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, कोणास सदर अर्जाबाबत काही वाद, हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (क. स्तर) कोर्ट नं. ६, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहुन सदरकामी आपले म्हणणे, तकार, लेखी हरकत सादर करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणचीही तकार, लेखी हरकत न आल्यास सदरकामी कोणाची काहीएक हरकत नाही, असे गृहित धरण्यात येवून सदर अर्जाचे कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत कै. शोभाबाई आसाराम पाटील (सोनवणे) यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही, काहीएक हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ : धुळे
दि. १७/०७/२०२३

कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायालय, धुळे — (शिक्का) — अधिक्षक, दिवाणी न्यायालय, धुळे

---

ॲड.संतोष एस. केदार धुळे
निशाणी नं.६

### जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. सह दिवाणी न्यायाधिश सो. वरीष्ठ स्तर यांचे कोर्टात**

दिवाणी किरकोळ अर्ज नंबर - ८५२/२०२३

१. श्रीमती शोभा पंडीतराव पाटील वगैरे ....अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही ...सामनेवाला

ज्या अर्थी अर्जदार यांनी अर्जदार हे कै. पंडितराव रामदास पाटील यांचे वारस असुन कै. पंडितराव रामदास पाटील हे दि.२२/०५/२०२२ रोजी मयत झालेले आहे. त्यांचे नावे अ. अजंग ता. जि. धुळे येथील शेत गट क्र.३०३/२ चे क्षेत्र ० हे ६० आर आकार रुपये १.९७ पैसे, अजंग/कासवीर ता. जि. धुळे येथील ग्रामपंचायतमालमत्ता क्र.४८० चे क्षेत्र ५० X १६ ८०० चौ.फु. यांसी सि.स.नं.२६३, क्षेत्र ११३.७० चौ.मी., अजंग / कासवीर ता. जि. धुळे येथील ग्रामपंचायतमालमत्ता क्र.१४१ चे क्षेत्र ५० X १६ ८०० चौ.फु. यांसी सि.स.नं.९४, क्षेत्र ७०.६० चौ.मी., आंबोडे ता. जि. धुळे येथील आंबोडे शिवारातील शेत गट क्र.८७/१/ब चे क्षेत्र १ हे ६० आर आकार रुपये ६०.५० पैसे, धुळे मनपा हद्दीतील देवपुर येथील गट क्र. ३७/२ पैकी प्लॉट ४२ चे क्षेत्र १.३९.९५ चौ.मी आकार रुपये १२६.०० पैसे यांसी सि.स.नं. ८३८३, धुळे मनपा हद्दीतील गट क्र. ३१७/१ पैकी प्लॉट नं.३४ चे क्षेत्र १.०८ चौ. मी. यांसी सि.स.नं. ११३२५ एकुण क्षेत्र २१० यातील १०५ चौ.मी या मिळकतींना मयताचे वारसांची म्हणजे अर्जदारांची नावे लावण्यासाठी तसेच इतरही शासकीय कामांसाठी अर्जदारांना ते मयत पंडितराव रामदास पाटील यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळणेकामी या कोर्टात अर्ज दाखल केला असुन सदर अर्जाची पुढील चौकशी दि.२९/०८/२०२३ रोजी ठेवण्यात आली असुन उक्त दिवशी या अर्जाबाबत कोणाची काहीएक हरकत असल्यास सकाळी १०:३० वाजता मे.कोर्टात हजर राहुन आपली हरकत नोंदवावी. उक्त दिवशी कोणीही हजर न राहील्यास कोणाचीही काहीएक हरकत नाही असे समजुन मे.कोर्ट पुढील आदेश प्रारीत करेल.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे
दि.१७/०७/२०२३ — आदेशावरून

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, धुळे — (शिक्का) — अधिक्षक, दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, धुळे

---

ॲड.संतोष एस. केदार धुळे
निशाणी नं.६

### जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.चिफ ज्युडि. मॅजि. सो. धुळे यांचे कोर्टात**

फौ. कि. अर्ज नं.५९२/२०२३

कैलास नथ्थु पाटील उ.व. : ३३ वर्ष, कामधंदा : खाजगी नोकरी
रा.:- नंदाणे, ता.जि.धुळे. ह.मु. भगवती नगर, प्लॉट नं. ७१अ, देवपुर, धुळे, ता.जि.धुळे. ....अर्जदार
विरुध्द
म. ग्रामसेवक सो.,
ग्रामपंचायत कार्यालय, बुरझड, ता. जि. धुळे. ...सामनेवाला

**(कैलास नथ्थू पाटील याचा जन्म दि. ११/०१/१९९१)**

ज्याआर्थी अर्जदाराने धुळे येथील मे. ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. धुळे दि. १४/७/२०२३ रोजी फौ. कि. अर्ज. नं.५९२/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे कैलास नथ्थु पाटील याच्या जन्माची नोंद करणेबाबत धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दि. २/९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. न्यायदडांधिकारी सो. प्रथम वर्ग कोर्ट नं. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- १५/७/२०२३

कामगिरी कारकुन, मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं. — (शिक्का) — अधिक्षक, मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.९

---

प्रोसेस जमा — ॲड.अरुणा महाजन
निशाणी नं.६

### जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.चिफ ज्युडीशिअल मॅजीस्ट्रेट सो. यांचे कोर्टात.**

फौ. कि अर्ज क्र. ५६०/२०२३

श्री.भटू श्यामराव पाटील वय-६६ वर्षे, धंदा-शेती
रा. मु.पो. देवभाने, ता. जि. धुळे- ४२४३०७ ....अर्जदार
विरुध्द
मा. निबंधक सो. जन्म व मृत्यु नोंदणी विभाग,
तथा ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय, देवभाने, ता.जि.धुळे ...जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांचे वडील कै. शामराव जयराम पाटील ( देसले) यांचा मृत्यु दि. ०२/०२/२००१ रोजी मौजे देवभाने, ता. जि. धुळे येथे झालेला आहे. त्याच्या मृत्युची नोंद राहून गेल्यामुळे अर्जदारच्या वडीलांची मृत्युची नोंद होवून मृत्यु दाखला मिळण्यासाठी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम-१९६९ प्रमाणे मा. ग्रामपंचायत देवभाने, ता. जि. धुळे जन्म-मृत्यु नोंदणी कार्यालय, ग्रामपंचायत देवभाने, ता. जि. धुळे येथे होण्याकरिता व तसा आदेश होण्याकरिता सदरचा अर्ज धुळे येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग सो. यांचे कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील मृत्युची नोंद देवभाने, ता. जि. धुळे येथे होण्याकरिता दाखल असलेल्या सदरच्या अर्जाबाबत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी धुळे येथिल ज्युडि मॅजि. वर्ग-१ सो, यांचे कोर्टात कोर्ट नं. १ यांचे न्यायालयात दि.१९/८ /२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकिलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे कुणाचीही हरकत न आल्यास कुणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जाकामी योग्य ते आदेश पारित करण्यात येतील. सदर नोटीस मे. कोर्टाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली आहे.

धुळे
दि. ४/०७/२०२३

कामगिरी कारकुन, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्रं. १ धुळे — (शिक्का) — अधिक्षक, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्रं. १ धुळे

---

## जेलरोड परिसरात लघुदाब विद्युत वाहिनी तारा भूमिगत करणार- आ. ढिकले

**नाशिकरोड । प्रतिनिधी**

जेलरोड परिसरातील संपूर्ण लघुदाब विद्युत वाहिनी तारा भूमिगत करण्यात येणार असून वीर सावरकरनगर परिसरातही विद्युत तारा भूमिगत करण्याचे काम त्वरित करत असल्याचे आ. राहुल ढिकले यांनी सांगितले. ते वीर सावरकरनगर येथील भूमिपूजन समारंभप्रसंगी बोलत होते.

जंगली महाराज मंदिरात सभामंडप नूतनीकरण करण्याचे काम करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. जैलरोड परिसरात आपल्या आमदार निधीतून अनेक प्रकल्प प्रगतीपथावर असल्याचे आ. ड. राहुल ढिकले यांनी सांगितले. तसेच दसक अमरधाम जवळ एक कोटी खर्चाचे भव्य गंधमुक्ती सभागृह उभारले जाणार असून जेलरोड परिसरात नागरी सुरक्षेसाठी सीसीटीव्ही मोठ्या प्रमाणात बसवण्यात येतील असे सांगून ते म्हणाले की, मराठानगर नंतर वीर सावरकरनगर येथे सुमारे १२ लाख रुपये खर्चाचे भूमिगत विद्युत तारा बसविण्याची मोहीम हाती घेण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

---

ॲड. दिनेश उत्तम फुले, धुळे
निशाणी नं.६

### जाहिर नोटीस

**धुळे येथिल मा.दिवाणी न्यायाधिश सो व.स्तर यांचे न्यायालयात**

दि. कि. अर्ज क्र. २८८/२०२३

कै. सुशिलाबाई रतिलाल भावसार मयत तर्फे वारस
१. अशोक रतिलाल भावसार उ.व.-७०, धंदा-मजुरी
रा. १८, कोठारी पार्क, नंदुरबार चौफुली, हस्ती भवन जवळ, दोंडाईचा, ता.शिंदखेडा, जि.धुळे.
२. प्रदिप रतिलाल भावसार उ.व.-६२, धंदा-खाजगी नोकरी
रा. एन४२, सी. सी १-६-४, हेगडेवार चौक, एमएसईबीजवळ, त्रिमुर्ती चौक, सिडको, नाशिक.
३. शिरिष रतिलाल भावसार उ.व.-६०, धंदा-खाजगी नोकरी,
रा.भगवती नगर, हिरावाडी, पंचवटी, नाशिक
४. सौ.रंजना विनोद भावसार उ.व.-४६, धंदा-घरकाम
नं.रूम नं. डी५१, डीजीपी नगर, कामटपुरा, गणपतीमंदिरामागे, नाशिक .....अर्जदार
विरुध्द
१. सौ.वंदना महेंद्र भावसार उ.व.-५७, धंदा-घरकाम
रा.इतवारा, रंगीहटी, नागझीरी, लाल कुव्याजवळ, बुरहानपुर, (मध्यप्रदेश)
२.श्रीमती सरला उर्फ शकुंतला देविदास भावसार उ.व.-५४,धंदा-घरकाम
३. स्वप्नील देविदास भावसार उ.व.-३४, धंदा-खाजगी नोकरी,
४. विनोद देविदास भावसार उ.व.-३१, धंदा-खाजगी नोकरी,
५. कु. हेमांगी देविदास भावसार उ.व.-२९, धंदा-घरकाम
नं. २ ते ५ रा. बी-६, ३०३, गंगा ॲन्सेला, ईऑन आयटी पार्कचे मागे, खराडी, पुणे. ...सामनेवाला
आणि
कै. रतिलाल बाबुलाल भावसार (मयत) मृत्यु दि. १६/०८/२०१६
मृत्यु ठिकाण : कुसुंबे, ता. जि. धुळे
२. कै. देविदास रतिलाल भावसार (मयत) मृत्यु दि. १८/११/२०१६
मृत्यु ठिकाण : नंदुरबार ...मयत

ज्याआर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात कै. रतिलाल बाबुलाल भावसार (मयत) यांचे अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय तसेच इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने तसेच अर्जदार नं. १ ते ४ व सामनेवाला नं. १ ते ५ हे कै. रतिलाल बाबुलाल भावसार (मयत) यांचे कायदेशीर वारस असून तसा वारस दाखला मिळणेसाठी दि २४/२/२०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. १८/८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर कोर्ट नं.८ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणा-या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण : धुळे
दिनांक :- १७/०७/२०२३ — आदेशावरुन

कामगिरी कारकुन, मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं. — (शिक्का) — अधिक्षक, मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.

---

प्रोसेस जमा — ॲड. महेश अ.चव्हाण
निशाणी नं.६

### जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. सह दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर धुळे यांचे कोर्टात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ८६६/२०२३

श्रीमती मालुबाई लोटन देसले वै. ....अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही ...सामनेवाला
लोटन हिलाल देसले ...(मयत)

ज्या अर्थी अर्जदार यांनी मयत लोटन हिलाल देसले हे दि. १३/०४/२०२३ रोजी मौजे विंचुर, ता.जि.धुळे येथे मयत झाले. त्यामुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे प्रमाणे कायदेशीर वारस ठरवून मिळणेकरीता सदरचा दावा मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्या अर्थी जर कोणत्याही व्यक्तीस काहीही हरकत असेल तर त्यांनी वर नमुद केसचेकामी दि. ३१/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास मे. कोर्टात व्यक्तीशः व आपल्या वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे/हरकत नोंदवावी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- १७/०७/२०२३ — आदेशावरुन

कामगिरी कारकुन, सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे — (शिक्का) — अधिक्षक, सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे

---

ॲड. महेश अ. चव्हाण
निशाणी नं.६

### जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. ७ वे सह दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर धुळे यांचे कोर्टात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ५९५/२०२३

श्रीमती मनिषा सुनिल सोनवणे वै. ....अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही ...सामनेवाला
सुनिल रामदास सोनवणे ...(मयत)

ज्या अर्थी अर्जदार यांनी मयत सुनिल रामदास सोनवणे हे दि. ३०/०३/२०२३ रोजी अशोका मेडीकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे मयत झाले. त्यामुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे प्रमाणे कायदेशीर वारस ठरवून मिळणेकरीता सदरचा दावा मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्या अर्थी जर कोणत्याही व्यक्तीस काहीही हरकत असेल तर त्यांनी वर नमुद केसचेकामी दि. २२/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास मे. कोर्टात व्यक्तीशः व आपल्या वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे/हरकत नोंदवावी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक : १७/०७/२०२३ — आदेशावरुन

कामगिरी कारकुन, सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे — (शिक्का) — अधिक्षक, सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे

## न्यूज कॉलम

### नदीपात्रात बुडून १३ वर्षीय बालकाचा मृत्यू

**धुळे ।** शिरपूर येथील वरवाडे गावातून बेपत्ता असलेल्या १३ वर्षीय बालकाचा अरुणावती नदीपात्रात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली. दिनेश रतिलाल मोरे असे या बालकाचे नाव असून तो काल दुपारी एक वाजेपासून घरातून बेपत्ता होता. त्याचा मृतदेह अरूणावती नदीपात्रात तरंगतांना आढळून आला. सावळदे गावचे मुळ रहिवासी रतिलाल मोरे हे शिरपूर आगारात चालक म्हणून कार्यरत आहेत. मित्रांसह पाचवीतशिकणार्या दिनेशचा असा दुर्दैवी मृत्यू झाल्याने मोरे कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### सावळी येथे शेतीच्या कारणावरून वाद

**धुळे ।** शहराच्या तालुक्यातील सावळी येथे शेतीच्या कारणावरून साहेबराव लक्ष्मण मराठे ( वय ४३ ) यांना गोरख हिरामण मराठे, महारू हिरामण मराठे, अशोक हिरामण मराठे, दीपक अशोक मराठे ( सर्व रा. चिंचखेडा, ता. धुळे) यांनी मारहाण केली. दुसर्‍या गटाच्या वतीने गोरख हिरामण मराठे (वय ३५) यांनी तक्रार दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार नीलेश संजय जगताप, साहेबराव लक्ष्मण मराठे, सचिन संजय जगताप, राकेश संजय जगताप यांनी मारहाण केली. परस्परविरोधी तक्रारीवरून धुळे तालुका पोलिस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धुळे शहराचे 'बॅनरबाजी'मुळे विद्रुपीकरण









### बॅनर हटविण्याची नागरिकांची मागणी

**धुळे । प्रतिनिधी**

कुठल्याही शहराची निर्मिती करताना नगररचना विभाग महत्वाची भूमिका बजावतो. रस्ते कुठून असावे, पार्किंगची व्यवस्था कशी असावी यासह अनेक बाबी असतात. मात्र, या नियमांना डावलले जात असल्याचे दिसून येत आहे.

सध्या धुळे शहरात खासगी जाहिरातदारांच्या फलकबाजीमुळे शहराच्या सौंदर्याचे विद्रुपीकरण झाले आहे. शहरात राजकीय व सर्वत्र भाऊंचा वाढदिवस अन खाजगी क्लासेच्या बॅनरबाजीमुळे शहराचे विद्रुपीकरण झाले आहे. याकडे स्थानिक प्रशासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात येत नाही. तसेच शहरात अनेकदा राजकीय फ्लेक्सबाजी होत असते. खरं पाहिले तर प्रत्येक पक्षातील नेत्यांनी ठरवले तर आपले शहर सुंदर शहर म्हणून ओळख निर्माण करू शकते. मात्र, शहरात सर्रासपणे नेत्यांचीच बॅनरबाजी चालू असते. त्यामुळे शहर विद्रुपीकरणात नेत्यांचाही मोठा हातभार दिसून येत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. मनपा प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे. धुळे शहर स्मार्टसिटीच्या ऐवजी फलकांचे शहर बनले. या शहराच्या सौंदर्याला खीळ घालणार्या या जाहिरातदारांना आवर घालण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. पालिका प्रशासनाने या जाहिराती तातडीने काढून संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्याचीही मागणी होत आहे.

**बॅनरमुळे वाहतूक कोंडी**

**धुळे शहरातील नेहरू चौकात अमित ठाकरेच्या दोऱ्या निमीत्त लावण्यात आलेल्या बॅनर मुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी देखील होत होती. याचा त्रास स्थानिक नागरिकांसह प्रवासी आणि वाहनचालकांना सहन करावा लागत आहे.**

सण, उत्सव असोत की कार्यकर्ता वा नेत्याचा वाढदिवस, किंवा कोणाची मोठ्या पदावर नियुक्ती झाल्यास रातोरात गल्लीबोळापासून ते मुख्य रस्त्यापर्यंत शहरामध्ये बेकायदा बॅनर, होर्डिंग्ज लावले जातात. रस्त्यावरील विद्युत खांबांवर किंवा इतर मोक्याच्या ठिकाणी बॅनर लावण्यात येत असून काही वेळेला बॅनरमुळे दिशादर्शक फलक झाकले जातात. मात्र, याचे कोणालाच काही गांभीर्य नाही. बस थांब्यांवरही बॅनर लावले जात असून बॅनर लावण्यामध्ये राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते आघाडीवर असतात. अनेकदा संपूर्ण शहर होर्डिंगमय होऊन जाते. जिकडे नजर जाईल तिकडे बॅनर, होर्डिंग्ज नजरेस पडतात. अनेक भिंतीवरही भित्तिपत्रके लावून भिंतीचे विद्रुपीकरण करण्यात येते. परंतु, अनधिकृत बॅनर, होर्डिंग्ज लावणाऱ्यांविरुद्ध महापालिका प्रशासनाकडूनही कडक कारवाई होत नसल्याचे दिसून येते.

# मुख्यमंत्री महाराष्ट्र ट्रेडर्स वेल्फेअर बोर्डची स्थापना करण्याची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



### लवकरच निर्णय घेण्याचे मुख्यमंत्र्यांचे ललित गांधी यांना आश्वासन

**नाशिक । प्रतिनिधी**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने नाशिक दौऱ्यावर आलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे राज्यातील व्यापारी उद्योजकांचे प्रश्न सोडवण्यासाठी महाराष्ट्र ट्रेडर्स वेल्फेअर बोर्डची स्थापना करण्याची निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

शिष्टमंडळात वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमन संजय सोनवणे व कार्यकारणी सदस्य उपस्थित होते. अध्यक्ष ललित गांधी यांनी याप्रसंगी केंद्र सरकारने याबाबत निर्णय घेऊन नुकतीच नॅशनल ट्रेडर्स बोर्डची स्थापना केली आहे. या रचनेमध्ये राज्यांनी राज्यस्तरावर अशा बोर्डची स्थापना करणे अभिप्रेत असल्याचे सांगितले.

महाराष्ट्रात सध्या एक कोटीहून अधिक संख्येने असलेल्या व्यापाऱ्यांच्या विकासासाठी महाराष्ट्र ट्रेडर्स वेल्फेअर बोर्डची स्थापना करणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच राज्यातील व्यापार उद्योग क्षेत्राचे प्रश्न, नवीन उद्योगांना सवलती, वीज दरवाढ, व्यापार क्षेत्राचे प्रश्न, फूड सेफ्टी ऍक्ट, बाजार समिती कायदा, महापालिका, नगरपालिका क्षेत्रातील दुकान गाळ्यांच्या भाड्याचे प्रश्न अशा विविध विषयांवर संबंधित प्रश्न सुटणे आवश्यक असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना यावेळी सांगितले.

याप्रसंगी कार्यकारणी सदस्य राजाराम सांगळे, सचिन शहा, व्हीनस वाणी, दत्ता भालेराव, रणजितसिंग आनंद, अजय शहा, ओमप्रकाश गगराणी, नेहा खरे, भावेश मानेक, मनीष रावल, संजय राठी, रवींद्र झोपे, कैलास पाटील, रतन पडवळ आदींसह कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.



# स्व.ढिकले स्पोर्ट्स फाउंडेशनतर्फे ऋणनिर्देश पुरस्कार वितरण उत्साहात

**नाशिक ।** नरवीर शिवा काशीद यांच्या स्मृती दिनानिमित्त स्व. उत्तमरावजी ढिकले स्पोर्ट्स फाउंडेशन व दुधारे स्पोर्ट्स फाउंडेशन यांचे संयुक्त विद्यमाने नाभिक समाज बांधवांसाठी ऋणनिर्देश पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला मखमलाबाद, आडगाव, पंचवटी, नाशिकरोड, जेलरोड, बिडी कामगारनगर, अमृतधाम, तपोवन, पेठ रोड, म्हसरूळ या विविध भागातील नाभिक समाजाचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभागाचे जेष्ठ माजी नगरसेवक अरुण पवार होते. तसेच माजी नगरसेवक उल्हास धनवटे, म्हसरूळ पोलीस स्टेशनचे निरीक्षक राजेंद्र पाचोरकर, नाभिक समाजाचे जेष्ठ समाजसेवक सुभाष बिडवई, नाशिकरोडचे नाभिक समाजाचे सामाजिक कार्यकर्ते संजय गायकवाड, शिवा फ्रेंड सर्कलचे संस्थापक सोमनाथ वडजे, वैदू समाजाचे नेते अशोक पैलवान जाधव, अखिल भारतीय मराठा महासंघ क्रीडा विभागाचे जिल्हा अध्यक्ष दीपक पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन दुधारे स्पोर्ट्स फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक दुधारे व उत्तमरावजी टिकले स्पोर्ट्स फाउंडेशनचे सरचिटणीस दीपक निकम यांनी केले. तर सुत्रसंचालन अविनाश वाघ यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संतोष वाघ, आनंद चकोर, राजीव वाकडे, ज्योती निकम, मनीषा काठे आदींनी परिश्रम घेतले.

# मुदखेडा येथील अल्पवयीन मुलीच्या बळीप्रकरणी गावगुंडाला फाशी द्यावी

### कासार समाजाची मागणी

**चिमठाणे । प्रतिनिधी**



निवघा (ता.मुदखेड जि. नांदेड) येथील आरोपी ज्ञानेश्वर पवार यांच्यावर पोस्को (बाल लैंगिक अत्याचार) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून फाशीची शिक्षा देण्याची मागणी कासार समाज करत आहे. यासंदर्भात कासार समाजाच्या शिष्टमंडळाने तहसीलदार यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, मुदखेड तालुक्यातील निवघा गावातील कासार समाजाची अल्पवयीन विद्यार्थिनीचा गावगुंड ज्ञानेश्वर ऊर्फ सोन्या याने मागील वर्षभरात अनेकवेळा छेडछाड करून अतोनात छळ केला आहे. त्याच्या छळामुळे अखेर १२ जुलै रोजी या अल्पवयीन मुलीचा बळी घेतला. मुलगी अल्पवयीन असल्यामुळे या गावगुंडावर पोस्को बाल लैंगिक अत्याचार कायदयांतर्गत गुन्हा दाखल करून आरोपींस फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी समस्त कासार समाजाची मागणी आहे. आपल्या शासनात महिला, युवती व विद्यार्थीनींमध्ये सुरक्षीततेची भावना निर्माण होण्यासाठी अशा गांवगुंडावर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. आज अशा घटनेमुळे समाजमन खिन्न झाले आहे. जनसामान्यात रोष निर्माण झाला असून या गुंडावर वेळीच आळा घालून महिला, मुलींना सुरक्षीततेचे वातावरण निर्माण करणेसाठी कठोर पावले उचलणे गरजेचे आहे. अशी देखील मागणी केली आहे. यावेळी दिनेश कोळपकर, सचिन कोळपकर, राजेंद्र शेटे, बंटी उर्फ अनिल तांबट, उमेश कोळपकर, सौरभ कोळपकर, रजनीकांत कोळपकर, महेश शामराव कोळपकर तसेच शिंदखेडा शहरातील कासार समाज बांधव महेश दगडुशेठ कोळपकर, राजेंद्र गोकुळ आदमण कार्यक्रमात उपस्थित होते.

# दिपालीनगर, विनयनगर परिसरात नामदेव महाराजांना अभिवादन



**नाशिक । प्रतिनिधी**

विनयनगर, दीपालीनगर आणि परिसरातील विठ्ठल रुक्मिणी बहुउद्देशीय संस्था आणि समस्त शिंपी समाज बांधव यांच्या वतीने संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांचा ६७३ वा संजीवन समाधी सोहळा उत्साहाने साजरा करण्यात आला. येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात संपन्न झालेल्या सोहळ्यात प्रतिमापूजन, आरती, प्रसाद वाटप करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष पंडितराव नेरे, रोहिणी सावळे, भारत बिरारी यांच्या संकल्पनेतून आयोजित या कार्यक्रमात डॉ. सुनील औंधकर, डॉ. प्रतिभा औंधकर, उपनिबंधक संजय गिते, राजेश सावळे, विनायक महाले आदींचे हस्ते आरती करण्यात आली. यावेळी दिनेश चौधरी, मधुकर पाटील, सुवर्णा बिरारी, ऋषिकेश कोल्हे, किशोर सोनवणे, दत्तात्रय शिंदे, सुरेश पुरोहित, राजेंद्र उसवाडकर आणि परिसरातील नागरिक व महिला मंडळ सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बॉडीबिल्डर जितू देसले यांचा सत्कार



**धुळे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील शिरुड गावाचा पहिला बॉडी बिल्डर किरण सुनील तांबे यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त त्यांचे गुरुवर्य मार्गदर्शक म्हणून उत्तर महाराष्ट्राचे फिटनेस आयकॉन बॉडी बिल्डर जितू देसले सर यांचा संपूर्ण शिरूड ग्रामस्थांच्या वतीने सत्कार समारंभ घडवून आणला.

यावेळी ललित कुलकर्णी हे जितू सरांविषयी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, आजपर्यंत ग्रामस्थांनी जितू सरांना सोशल मीडियावरच त्यांना बघितलेलं होतं. आज प्रत्यक्ष भेटून त्यांनी आपलं मत मांडलं. बॉडी बिल्डिंग क्षेत्रात बऱ्याच वेळा असे लोक भेटतात. जे हे विसरून जातात की आपल्याला कोणीतरी मार्गदर्शन केलं होतं. त्याला विसरून जातात आणि असे वागतात की माझ्यासारखा कोणीच नाही. असेही दाखवतात की स्वतःच्या जीवावर हे सगळं मिळवले. स्वार्थी लोक या क्षेत्रात एवढे भेटतील की फक्त गरज आणि फायदा होईल तोपर्यंत ओळख ठेवतात. जितु सर मी खरच तुम्हाला मानतो कारण तुम्ही कधी स्वार्थीपणा केला नाही. साधेपणा आणि दिलदारपणामुळेच बरेच जणांनी जितू सरांचा फक्त फायदा घेतला आणि विसरून गेले. ही आजची सत्य परिस्थिती आहे. पण तरी जितूसरांनी मोफत मार्गदर्शन देणे व प्रत्येक युवकाला घडवणे अजूनही सोडलं नाहीः सर्व ग्रामस्थ हे मनोगत ऐकल्यावर भारावून गेले व त्यांनी जितू दिसले सर यांचे आभारही मानले.

# वैदिक परंपरा गोदावरीसारखी विशाल व्हावी : कुलगुरु डॉ. वरखेडी

### राष्ट्रीय वेदशास्त्र संस्कृत पुरस्कार प्रदान सोहळा उत्साहात

**नाशिक । प्रतिनिधी**

पुण्यभूमी नाशिकमध्ये अत्यंत उत्तम अनुकरणीय उपक्रम झाला आहे. वैदिक परंपरेचे व संस्कृतचे येथे जतनाचे, संवर्धनाचे कार्य होते. जीवन समर्पित करून विश्वगुरु होण्यासाठी अनेकांचे योगदान आहे. नव्या शैक्षणिक धोरणाने नवीन जागृती पण इंग्रजी, परकीय भाषा शिकणारी नवी पिढी संस्कृत विसरत आहे. आजचा सत्कार सोहळा समाजाला प्रेरित करेल. नवी पिढी वेदशास्त्राकडे आकृष्ट व्हायला हवी. वैदिक परंपरा गोदावरी सारखी विशाल व्हावी असे प्रतिपादन दिल्लीच्या केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलगुरू प्रा. डॉ. श्रीनिवास वरखेडी यांनी केले.

येथील महर्षी गौतम गोदावरी वेदविद्या प्रतिष्ठान, दक्षिणाम्नाय श्री श्री जगद्गुरु शंकराचार्य महासंस्थान शृंगेरी, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेक व जनसंज्ञापन विभाग ऑरो विश्वविद्यालय (सुरत ) यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिकमध्ये राष्ट्रीय वेदशास्त्र महापरिषदेचे आयोजन करण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी (दि.१४) राष्ट्रीय वेदशास्त्र संस्कृत पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.




**पुरस्कारांनी यांचा झाला सन्मान**

**प्रमुख पाहुणे कुलगुरु डॉ. श्रीनिवास वरखेडी यांच्या शुभहस्ते कै.भास्कर अण्णा जोशी स्मरणार्थ राष्ट्रीय वेदशास्त्र शिरोमणी पुरस्कार वाराणसीचे गणेश्वरशास्त्री द्रविड यांना प्रदान करण्यात आला. धर्मभूषण गौरीशंकर राष्ट्रीय ऋग्वेद पुरस्कार चेन्नईचे हरीहरन घनपाठी यांना, नाशिकचे वेदाचार्य शांताराम भानोसे यांना यजुर्वेदासाठी तर सामवेद पुरस्कार बंगळुरुचे मानस मिश्रा यांना व अथर्ववेद पुरस्कार जालन्याचे दिनकर जोशी यांना प्रदान करण्यात आले. संस्कृत सेवाव्रती राष्ट्रीय पुरस्कार रामटेकचे मधुसूदन पेन्ना यांच्यावतीने प्रसाद गोखले यांनी पुरस्कार स्वीकारला. नाशिकच्या वैशाली वैद्य यांना सन्मानित करण्यात आले. वेदमूर्ती कै. नंदकुमार हरदास वेदवेदांग पुरस्कार नाशिकचे अभयशात्री पाठक व वैदिक छात्र पुरस्कार नाशिकच्याच वेदमूर्ती सौरभ पाठक यांना देण्यात आले.**

याप्रसंगी व्यासपीठावर वेदशास्त्र संपन्न गणेशशास्त्री द्रविड, वेदांतरत्न प्रमोदशास्त्री कुलकर्णी, प्रतिष्ठानचे सचिव व प्रधानाचार्य वेदाचार्य रवींद्र पैठणे, जनसंज्ञापन विभाग ऑरो विश्वविद्यालयाचे प्रमुख व ज्येष्ठ पत्रकार विश्वास देवकर आदी मान्यवर उपस्थित होते. मंगलाचरणाने, सरस्वती वंदनेने व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पैठणे गुरुजींनी स्वागत व मान्यवरांचे सत्कार केले. प्रास्ताविकात भूमिका विषद केली. विश्वास देवकर यांनी वेदशास्त्र महापरिषदेचा संकल्प यशस्वी झाल्याचे नमूद केले. केंद्रीय संस्कृत विश्व विद्यालयाचे नाशिकमध्ये केंद्र व्हावे असा प्रस्ताव दिला.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था **Admission Open**

**विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे**

NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111

B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.

डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत

संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A

B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.

सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.

प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798

शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053

P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology

पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.

संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344

प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735, प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र

बुधवार, दि. १९ जुलै २०२३
५



# धुळ्यात सुवर्णकार मंडळातर्फे गुणवंतांचा सत्कार

















धुळे।
विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात ध्येय निश्चित करून त्या दिशेने प्रामाणिक प्रयत्न केल्यास यश हमखास मिळते, असे प्रतिपादन खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी सुवर्णकार समाजयुवक मंडळातर्फे झालेल्या गुणवंतांच्या सत्कार कार्यक्रमात केले. धुळे जिल्हा सुवर्णकार समाज अंतर्गत कार्यरत सुवर्णकार युवक संघटनेच्या कार्याला ५० वर्षे पूर्ण झाल्याने समाजातील विविध घटकातील मान्यवरांचा, विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार झाला. खासदार डॉ. भामरे, भाजपचे महामंत्री विजय चौधरी, महापौर प्रतिभा चौधरी आदी उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना वह्यावाटप करण्यात आल्या. तसेच आदर्श सुवर्णकार गुणवंत कामगार पुरस्कार, कारागीर पुरस्कार, महिला संघटक पुरस्कार, विशेष गुणवंत पुरस्कार, रंगकर्मी पुरस्कार, आदर्श पुरस्कार विद्यार्थिनी, उत्कृष्ट लघुउद्योजक पुरस्कार, आदर्श कार्यकर्ता पुरस्कार यांचे वाटपही मान्यवरांच्या हस्ते झाले. खासदार डॉ. भामरे यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम करण्याचा सल्ला दिला. भाजपचे प्रदेश संघटन महामंत्री विजय चौधरी यांनी सुवर्णकार युवक संघटनेच्या उपक्रमांचे कौतुक केले. यश मिळवण्यासाठी प्रयत्न करा, भविष्यासाठी योग्य क्षेत्र निवडा, असे आवाहन केले. सुवर्णकार समाजाचे अध्यक्ष माजी महापौर चंद्रकांत सोनार, माजी महापौर प्रदीप कर्पे, माजी महापौर जयश्री अहिरराव, नगरसेवक देवेंद्र सोनार, विजय माळी, श्रेया सोनार, विरोधी पक्षनेत्या कल्पना महाले, अभिनेत्री अपूर्वा खरे, मिनाक्षी सोनार, संगिता पोतदार, संगिता विसपुते, मिना रनाळकर, चेतन मंडोरे, जगदीश देवपूरकर, सुनील देवरे, युवक अध्यक्ष रविराज चव्हाण, साईकिरण देवपूरकर, चंद्रकांत घोडके, किशोर मोरे, नकुल अहिरराव, गौरव अहिरराव, हेमंत बाविस्कर, सुरज अहिरराव, गौरव पिंगळे, अरुण दुसाने, मनोज घोडके, राकेश गाळणकर, दिग्विजय गाळणकर, अविनाश थोरात, श्याम सोनार, चेतन जडे, नरेश घोडके यांच्यासह सुवर्णकार समाजातील मान्यवर उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ





# आषाढ दीप अमावस्या निमित्त दीप पूजन



















धुळे। भाजपतर्फे आषाढी अमावस्या किंवा दिप अमावस्या ही आषाढ महिन्यातील अखेरीस येणाऱ्या अमावस्येला म्हटलं जातं. मावस्ये निमित्त दीपपूजा कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमात एका टेबलावर विविध आकाराच्या विविध धातूच्या दीवे पेटविण्यात आले होते. त्यात मातीचे, चिनी मातीचे, दगडाच्या विविध प्रकाराचे, विविध धातूच्या दिव्याचा त्यात समावेश होता. विजेवर चालणाने दिव्याचे प्रकारही पूजास्थानी ठेवण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी वर्गावर्गाच्या गटाने येऊन दिव्याची पूजा केली. प्रार्थना म्हणून एकाग्रपणे विविध दिव्याचे निरिक्षण केले. विद्यार्थ्यांना हा सण का साजरा केला जातो त्याची तसेच दिव्याच्या विविध प्रकाराची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढावी यासाठी त्यांना दिव्याच्या जोतीकडे एकटक बधून एकाग्रता कौशल्य वाढीचे प्रशिक्षण देण्यात आले. आपले आयुष्य इतरांच्या कल्याणासाठी वेचलेल्या महात्म्याचे स्मरण या दिवशी करावे इत्यादी मार्गदर्शन मुलांना करण्यात आले. विजेचा वापर जपून करावा. वीज कशी वाचवावी याची माहिती देण्यात आली. दीवा स्वत: जळतो व दूसऱ्यांना प्रकाश देतो. दीप अमावस्येला दिव्यांचं पूजन करून संध्याकाळी श्लोक म्हटले जातात. तिमिराकडून तेजा कडे नेणारा दिवा हा हिंदू धर्मामध्ये कायमच पूजनीय राहिला आहे. या दिव्याची पूजा करून अधर्माकडून धर्माकडून, दु:खाकडून सुखाकडे प्रवास व्हावा अशी मनोकामना केली जाते. आषाढी अमावस्या किंवा दीप अमावस्या ही आषाढ महिन्यातील अखेरीस येणाऱ्या अमावस्येला म्हटलं जातं. आषाढ अमावस्या ही चातुर्मासातील पहिली अमावस्या असं मानलं जातं. श्रावण महिन्याला सुरुवात होण्याच्या आदल्या दिवशी अमावस्या येते. या अमावास्येला गुरुपुष्यामृत योग देखील आहे. या अमावास्येला दीपपूजनाला अधीक महत्व प्राप्त झाले असून, ते भाग्यकारक मानले गेले आहे.